म.न.पा. ठराव कमांक 8 दिनांक 20.3.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30–3 नुसार गठीत विधी समितीची प्रथम सभा सोमवार दिनांक 12.6.2017 रोजी दुपारी 3–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात संपन्न झाली त्या सभेचे इतिवृत्त.

सभेत मा. सभापती श्रीमती मिनाक्षी तेलगोटे मा. उपसभापती श्रीमती विशाखा मोहोड, मा. सदस्य श्री महेश महाजन, मा. सदस्य श्री हरीष बागडे, मा. सदस्या श्रीमती अभिरुची राजगीरे, मा. सदस्या श्रीमती समिता चकोले,मा:. सदस्या श्रीमती हर्षला साबळे, मा. सदस्य श्री जितेन्द्र घोडेस्वार सहा. आयूक्त श्री धामेजा , प्रोसीक्युटर श्री कपले तथा विधी अधिकारी उपस्थित होते.

मा. सभापती यांनी सभेची कार्यवाही सुरु केली. सर्वाच्या परिचया नंतर विषय पत्रिकेतील

विषय कमांक 1 नुसार विधी विभागाबाबत सविस्तर माहिती व कार्य पध्दतीचा आढावा घेणे या विषयाच्या संदर्भात प्रोसीक्युटर श्री कपले यांनी विभागातर्फे परिपुर्ण माहितीचा लिखीत अहवाल प्रत्येक सदस्यांना प्रस्तुत केला. तथा विधी विभागाच्या संपूर्ण कार्यपध्दतीचे वर्णन केले.

विषय कमांक 2 नुसार विधी विभागाच्या पॅनलवर असलेल्या वकीलांबाबत व त्यांच्या नियुक्तीबाबत चर्चा विषयावर विभागातर्फे लिखीत माहिती प्रस्तुत करण्यात आली व माहिती देण्यात आली.

विषय कमांक 3 विधी समितीच्या कामकाजाचे धोरण निश्चित करणे या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली. यावर यानंतर वेळोवेळी होणा–या सभेत आवश्यकतेनुसार धोरण निश्चितीचे प्रस्तावीत करण्यात येईल असे निश्चित करण्यात आले.

यानंतर सभापतीव्दारे सभेचे समापन करण्यात आले.

| | |
|---|---|
| निगम सचिव | सभापती |
| नागपूर महानगरपालिका,नागपूर | विधी विशेष समिती |

मंगळवार दिनांक 03.10.2017 रोजी दुपारी 04:00 वाजता नागपूर महानगरपालिकेच्या विधी समितीच्या सिव्हिल कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

सभेत मा. सभापती, श्रीमती मिनाक्षी तेलगोटे, मा.सदस्य श्री. जितेंद्र घोडेस्वार, मा. सदस्या श्रीमती अभिरूची राजगिरे प्रशासनाकडून व्यवहार व न्यायअभियोक्ता( श्री. बरडे व श्री. कपले) अधिक्षक(बाजार विभाग), अधिक्षक (स्थावर विभाग) व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सदस्य व अधिकाऱ्यांचे स्वागत करुन सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली.

कोरम अभावी सभा 10 मिनिटाकरिता स्थगित करण्यात आली.

निगम सचिव
म.न.पा.नागपूर

सभापती
विधी समिती,
म.न.पा. नागपूर

मंगळवार दिनांक 03.10.2017 रोजी दुपारी 04:20 वाजता नागपूर महानगरपालिकेच्या विधी समितीच्या सिव्हिल कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिति सभागृहात भरलेल्या स्थगित सभेचा अहवाल.

सभेत मा. सभापती, श्रीमती मिनाक्षी तेलगोटे, मा.सदस्य श्री. जितेंद्र घोडेस्वार, मा. सदस्या श्रीमती अभिरूची राजगिरे प्रशासनाकडून व्यवहार व न्यायअभियोक्ता( श्री. बरडे व श्री. कपले) अधिक्षक(बाजार विभाग), अधिक्षक (स्थावर विभाग) व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

कोरम अभावी सभा 10 मिनिटाकरिता स्थगित करण्यात आली.

निगम सचिव
म.न.पा.नागपूर

सभापती
विधी समिती,
म.न.पा. नागपूर

**मंगळवार दिनांक 03.10.2017 रोजी दुपारी 04:30 वाजता नागपूर महानगरपालिकेच्या विधी समितीच्या सिव्हिल कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या स्थगित सभेचा अहवाल.**

**सभेत मा. सभापती, श्रीमती मिनाक्षी तेलगोटे, मा.सदस्य श्री. जितेंद्र घोडेस्वार, मा. सदस्या श्रीमती अभिरूची राजगिरे, मा.सदस्य श्री. महेश महाजन प्रशासनाकडून व्यवहार व न्यायअभियोक्ता( श्री. बरडे व श्री.कपले) अधिक्षक(बाजार विभाग), अधिक्षक (स्थावर विभाग) व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.**

मा. सभापती विधी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली. सभेच्या सुरुवातीस विषयपत्रिकेवरील विषयावर खालीलप्रमाणे सुरुवात करण्यात आली.

1. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत सेक्शन 81–ब अंतर्गत करण्या येणा–या कार्यवाहीबाबत नियमावली तयार करण्याबाबत संबंधित विभाग बाजार विभाग व स्थावर विभागासोबत चर्चा करतांना व्यवहार व न्यायअभियोक्ता श्री. कपले यांनी सांगितले कि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत सेक्शन 81–ब अंतर्गत महानगरपालिकेची जी काही मालमत्ता आहे ती महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करून घ्यावयाची आहे, त्यावरील ताबा घ्यावयाचा आहे याकरिता कार्यवाही करीत असतांना सेक्शन 81– अ, ब, क, ड सेक्शन दिलेले आहेत. ही कार्यवाही स्थावर विभाग आणि बाजार विभागाकडून होत असते. नवीन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाअंतर्गत सेक्शन 81–ब मध्ये या कार्यवाहीचा अंतर्भाव केलेला आहे. या अनुषंगाने जी काही प्रोसीजर दिलेली आहे त्यामध्ये नोटीस कशी द्यावयाची, त्या नोटीसचा फॉरमेट स्थायी समितीकडून अप्रुव्हल करून घ्यावयाचा आहे. त्यानंतर सुनावणी दिल्यानंतर आदेश पारीत करावयाचे आहे. याअनुषंगाने स्थावर विभाग आणि बाजार विभाग यांनी सेक्शन 81–ब अंतर्गत काही रेग्युलेशन तयार केले आहेत काय? हे तपासून घ्यावे लागेल. उच्च न्यायालयाने एका प्रकरणात आयुक्तांना सिव्हील कोर्टाचा पॉवर दिलेला आहे त्याप्रमाणे नियमावली तयार करून घ्यावयाची आहे अशी माहिती त्यांनी दिली.

मा.सदस्य श्री.जितेंद्र घोडेस्वार यांनी त्यांच्या परिसरात नागपूर महानगरपालिकेच्या मालकीचे दुकानात पंचशक्ती बिअर बार उघडलेले आहे अशी माहिती दिली. त्या संदर्भात काय कार्यवाही केली तसेच रस्त्यावर मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले असते, छोटे, मोठे दुकाने थाटण्यात येतात त्यामुळे शहरात सर्वत्र अस्वच्छता आढळून येते. यामुळे स्वच्छतेच्या क्रमांकात नागपूर शहर मागे जात असतांना झोन स्तरावरून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येत नाही. या अनुषंगाने विधी विभागामार्फत काय कार्यवाही करण्यात येते अशी विचारणा केली असता बाजार अधिक्षक यांनी माहिती देतांना सांगितले कि वाईन शॉप करिता बाजार विभागाची जागा दिल्या

जात नाही. या प्रकरणांत वाईन शॉपसाठी त्यांनी लायसन्स घेतलेले आहे. कार्यवाहीच्या अनुषंगाने या प्रकरणी आणि कमाल चौक या दोन प्रकरणी हायकोर्टात प्रकरण गेल्यामुळे हायकोर्टाने त्यांना प्रोटेक्शन दिलेले आहे. परवाना शुल्क न भरणा–या दुकानदारांच्या संदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे. फुले मार्केटच्या दक्षिण भागातील फिडर रस्त्यावरील दुकानावर कार्यवाही करण्यात आली आहे. पुढील आठवडयात सुध्दा कार्यवाही करण्याचे ठरविलेले आहे. कार्यवाहीसाठी पोलीस विभागाकडून वेळेवर मदत न मिळाल्यामुळे कार्यवाही पुढे ढकलावी लागते असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत सेक्शन 81–ब अंतर्गत करण्या येणा–या कार्यवाहीबाबत नियमावली तयार करण्यात आली नसल्याचे त्यांनी सांगितले.

मा.सदस्य श्री. महेश महाजन यांनी सुध्दा इतवारी भागात सुभाषपुतळा ते तिन्नलचौक या भागात फळांच्या दुकानदारांनी रस्त्यावर अतिक्रमण केल्यामुळे नागरिकांना मोठया प्रमाणात त्रास होते असे सांगितले.

व्यवहार व न्यायअभियोक्ता श्री. कपले यांनी माहिती देतांना सांगितले कि, महासभेने एक ठराव पास केला होता त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या मालकीचे कोणतेही दुकान दारू व्यावसायिकांना देण्यात येत नाही. या अनुषंगाने जी दोन–तीन प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत त्यावर हायकोर्टाने स्थगणादेश दिलेला आहे. कोणत्या कारणाने स्थगनादेश दिलेला आहे त्याचा अभ्यास करून स्थगनादेश उठविण्याची कार्यवाही करण्यात येईल. रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याच्या संदर्भातील विषय विधी विभागाच्या अखत्यारितला नसून क्षेत्रिय कार्यालयाशी संबंधित आहे. 10 झोनच्या सहा. आयुक्तांमार्फत अतिक्रमण दूर करण्याची कार्यवाही करणे अपेक्षित असल्यामुळे 10 झोनच्या सहा.आयुक्तांची आणि विधी विभागाची बैठक लावून अतिक्रमण काढण्याच्या संदर्भात समिती मार्फत निर्देशित करण्यात यावे असेही ते म्हणालेत.

या विषयाच्या अनुषंगाने मा.सभापती यांनी निर्देशित केले कि, संबंधित विभागाने या अनुषंगाने नियमावली तयार करावी आणि पुढच्या सभेत सादर करावी.

2. महानगरपालिकेतील कर्मचा–यांना न्यायालयात साक्ष कशी दयावी, कायदयांतील कलमाचे योग्य वापर कसे करावे व इतर कायदयांविषयक माहिती देण्याकरिता प्रशिक्षण शिबीर तसेच विविध विषयांवर सेमिनार आयोजित करण्याबाबत चर्चा केली असता व्यवहार व न्यायअभियोक्ता श्री. कपले यांनी माहिती देतांना सांगितले कि, महानगरपालिकेतील अधिका–यांना योग्य रित्या याबाबत प्रशिक्षण न दिल्यामुळे काही प्रकरणांत महानगरपालिकेच्या विरोधात निकाल आलेले आहेत. वेळेचा अभाव आणि कामाचा ताण यामुळे कुठेतरी तरी अधिकारी कमी पडत आहेत. त्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. योग्य मार्गदर्शक जे कुणी असतील किंवा कायदयाचे तज्ञ जे असतील

त्यांच्यामार्फत प्रशिक्षण दिले जावे. विधी विभागातर्फे याबाबत पुर्ण सहकार्य केले जाईल असेही ते म्हणालेत.

मा. सभापती यांनी निर्देशित केले कि, विधी विभागाने प्रशिक्षण शिबीर घेण्याच्या संदर्भातील तयारी करून समितीसमक्ष सादर करावी.

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत मा. आयुक्त यांनी खाजगी रस्त्यांबाबत नोटीफिकेशन काढून त्यांना सार्वजनिक रस्ते म्हणून घोषित करण्याबाबत चर्चा झाली असता व्यवहार व न्यायअभियोक्ता श्री. कपले यांनी माहिती देतांना सांगितले कि, कुठल्या रस्त्याचे नोटीफिकेशन झालेले आहे किंवा नाही याबाबत आजच्या घडीला माहिती नाही. करिता कार्यकारी अभियंत्याकडे कुठल्या रस्त्याचे नोटीफिकेशन झालेले आहे आणि कुठल्या रस्त्याचे झालेले नाही. याबाबत माहिती घेवून नोटीफिकेशन न झालेल्या रस्त्याचे नोटीफिकेशन करण्यासंबंधी समितीमार्फत निर्देशित करण्यात यावे असे त्यांनी सांगितले.

मा.सभापती यांनी निर्देशित केले की नोटीफिकेशन न झालेल्या रस्त्याचे नोटीफिकेशन कार्यकारी अभियंता यांनी करावे. मा.सदस्य श्री.घोडेस्वार यांनी सुचित केल्याप्रमाणे पुढच्या बैठकीत रस्त्यावरील अतिक्रमण आणि बाजार विभागातील दुकानावरील झालेले अतिक्रमणाच्या संदर्भातील विषय विषयपत्रिकेवर आणण्यात यावे असे मा. सभापती यांनी सुचित करून तदनंतर मा.सभापती विधी समिती यांनी सभेचे समापन केले.

**निगम सचिव**
**म.न.पा.नागपूर**

**सभापती**
**विधी समिती,**
**म.न.पा. नागपूर**

मंगळवार दिनांक 03.10.2017 रोजी दुपारी 04:00 वाजता नागपूर महानगरपालिकेच्या विधी समितीच्या सिव्हिल कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

सभेत मा. सभापती, श्रीमती मिनाक्षी तेलगोटे, मा.सदस्य श्री. जितेंद्र घोडेस्वार, मा. सदस्या श्रीमती अभिरूची राजगिरे प्रशासनाकडून व्यवहार व न्यायअभियोक्ता( श्री. बरडे व श्री. कपले) अधिक्षक(बाजार विभाग), अधिक्षक (स्थावर विभाग) व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सदस्य व अधिकाऱ्यांचे स्वागत करुन सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली.

कोरम अभावी सभा 10 मिनिटाकरिता स्थगित करण्यात आली.

निगम सचिव
म.न.पा.नागपूर

सभापती
विधी समिती,
म.न.पा. नागपूर

मंगळवार दिनांक 03.10.2017 रोजी दुपारी 04:20 वाजता नागपूर महानगरपालिकेच्या विधी समितीच्या सिव्हिल कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या स्थगित सभेचा अहवाल.

सभेत मा. सभापती, श्रीमती मिनाक्षी तेलगोटे, मा.सदस्य श्री. जितेंद्र घोडेस्वार, मा. सदस्या श्रीमती अभिरूची राजगिरे प्रशासनाकडून व्यवहार व न्यायअभियोक्ता( श्री. बरडे व श्री. कपले) अधिक्षक(बाजार विभाग), अधिक्षक (स्थावर विभाग) व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

कोरम अभावी सभा 10 मिनिटाकरिता स्थगित करण्यात आली.

निगम सचिव
म.न.पा.नागपूर

सभापती
विधी समिती,
म.न.पा. नागपूर

मंगळवार दिनांक 03.10.2017 रोजी दुपारी 04:30 वाजता नागपूर महानगरपालिकेच्या विधी समितीच्या सिव्हिल कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या स्थगित सभेचा अहवाल.

सभेत मा. सभापती, श्रीमती मिनाक्षी तेलगोटे, मा.सदस्य श्री. जितेंद्र घोडेस्वार, मा. सदस्या श्रीमती अभिरूची राजगिरे, मा.सदस्य श्री. महेश महाजन प्रशासनाकडून व्यवहार व न्यायअभियोक्ता( श्री. बरडे व श्री.कपले) अधिक्षक(बाजार विभाग), अधिक्षक (स्थावर विभाग) व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा. सभापती विधी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली. सभेच्या सुरुवातीस विषयपत्रिकेवरील विषयावर खालीलप्रमाणे सुरुवात करण्यात आली.

1. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत सेक्शन 81–ब अंतर्गत करण्या येणा–या कार्यवाहीबाबत नियमावली तयार करण्याबाबत संबंधित विभाग बाजार विभाग व स्थावर विभागासोबत चर्चा करतांना व्यवहार व न्यायअभियोक्ता श्री. कपले यांनी सांगितले कि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत सेक्शन 81–ब अंतर्गत महानगरपालिकेची जी काही मालमत्ता आहे ती महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करून घ्यावयाची आहे, त्यावरील ताबा घ्यावयाचा आहे याकरिता कार्यवाही करीत असतांना सेक्शन 81– अ, ब, क, ड सेक्शन दिलेले आहेत. ही कार्यवाही स्थावर विभाग आणि बाजार विभागाकडून होत असते. नवीन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाअंतर्गत सेक्शन 81–ब मध्ये या कार्यवाहीचा अंतर्भाव केलेला आहे. या अनुषंगाने जी काही प्रोसीजर दिलेली आहे त्यामध्ये नोटीस कशी द्यावयाची, त्या नोटीसचा फॉरमेट स्थायी समितीकडून अप्रुव्हल करून घ्यावयाचा आहे. त्यानंतर सुनावणी दिल्यानंतर आदेश पारीत करावयाचे आहे. याअनुषंगाने स्थावर विभाग आणि बाजार विभाग यांनी सेक्शन 81–ब अंतर्गत काही रेग्युलेशन तयार केले आहेत काय? हे तपासून घ्यावे लागेल. उच्च न्यायालयाने एका प्रकरणात आयुक्तांना सिव्हील कोर्टाचा पॉवर दिलेला आहे त्याप्रमाणे नियमावली तयार करून घ्यावयाची आहे अशी माहिती त्यांनी दिली.

मा.सदस्य श्री.जितेंद्र घोडेस्वार यांनी त्यांच्या परिसरात नागपूर महानगरपालिकेच्या मालकीचे दुकानात पंचशक्ती बिअर बार उघडलेले आहे अशी माहिती दिली. त्या संदर्भात काय कार्यवाही केली तसेच रस्त्यावर मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले असते, छोटे, मोठे दुकाने थाटण्यात येतात त्यामुळे शहरात सर्वत्र अस्वच्छता आढळून येते. यामुळे स्वच्छतेच्या क्रमांकात नागपूर शहर मागे जात असतांना झोन स्तरावरून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येत नाही. या अनुषंगाने विधी विभागामार्फत काय कार्यवाही करण्यात येते अशी विचारणा केली असता बाजार अधिक्षक यांनी माहिती देतांना सांगितले कि वाईन शॉप करिता बाजार विभागाची जागा दिल्या

जात नाही. या प्रकरणांत वाईन शॉपसाठी त्यांनी लायसन्स घेतलेले आहे. कार्यवाहीच्या अनुषंगाने या प्रकरणी आणि कमाल चौक या दोन प्रकरणी हायकोर्टात प्रकरण गेल्यामुळे हायकोर्टाने त्यांना प्रोटेक्शन दिलेले आहे. परवाना शुल्क न भरणा–या दुकानदारांच्या संदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे. फुले मार्केटच्या दक्षिण भागातील फिडर रस्त्यावरील दुकानावर कार्यवाही करण्यात आली आहे. पुढील आठवडयात सुध्दा कार्यवाही करण्याचे ठरविलेले आहे. कार्यवाहीसाठी पोलीस विभागाकडून वेळेवर मदत न मिळाल्यामुळे कार्यवाही पुढे ढकलावी लागते असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत सेक्शन 81–ब अंतर्गत करण्या येणा–या कार्यवाहीबाबत नियमावली तयार करण्यात आली नसल्याचे त्यांनी सांगितले.

मा.सदस्य श्री. महेश महाजन यांनी सुध्दा इतवारी भागात सुभाषपुतळा ते तिन्नलचौक या भागात फळांच्या दुकानदारांनी रस्त्यावर अतिक्रमण केल्यामुळे नागरिकांना मोठया प्रमाणात त्रास होते असे सांगितले.

व्यवहार व न्यायअभियोक्ता श्री. कपले यांनी माहिती देतांना सांगितले कि, महासभेने एक ठराव पास केला होता त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या मालकीचे कोणतेही दुकान दारू व्यावसायिकांना देण्यात येत नाही. या अनुषंगाने जी दोन–तीन प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत त्यावर हायकोर्टाने स्थगणादेश दिलेला आहे. कोणत्या कारणाने स्थगनादेश दिलेला आहे त्याचा अभ्यास करून स्थगनादेश उठविण्याची कार्यवाही करण्यात येईल. रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याच्या संदर्भातील विषय विधी विभागाच्या अखत्यारितला नसून क्षेत्रिय कार्यालयाशी संबंधित आहे. 10 झोनच्या सहा. आयुक्तांमार्फत अतिक्रमण दूर करण्याची कार्यवाही करणे अपेक्षित असल्यामुळे 10 झोनच्या सहा.आयुक्तांची आणि विधी विभागाची बैठक लावून अतिक्रमण काढण्याच्या संदर्भात समिती मार्फत निर्देशित करण्यात यावे असेही ते म्हणालेत.

या विषयाच्या अनुषंगाने मा.सभापती यांनी निर्देशित केले कि, संबंधित विभागाने या अनुषंगाने नियमावली तयार करावी आणि पुढच्या सभेत सादर करावी.

2. महानगरपालिकेतील कर्मचा–यांना न्यायालयात साक्ष कशी दयावी, कायदयांतील कलमाचे योग्य वापर कसे करावे व इतर कायदयांविषयक माहिती देण्याकरिता प्रशिक्षण शिबीर तसेच विविध विषयांवर सेमिनार आयोजित करण्याबाबत चर्चा केली असता व्यवहार व न्यायअभियोक्ता श्री. कपले यांनी माहिती देतांना सांगितले कि, महानगरपालिकेतील अधिका–यांना योग्य रित्या याबाबत प्रशिक्षण न दिल्यामुळे काही प्रकरणांत महानगरपालिकेच्या विरोधात निकाल आलेले आहेत. वेळेचा अभाव आणि कामाचा ताण यामुळे कुठेतरी तरी अधिकारी कमी पडत आहेत. त्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. योग्य मार्गदर्शक जे कुणी असतील किंवा कायदयाचे तज्ञ जे असतील

त्यांच्यामार्फत प्रशिक्षण दिले जावे. विधी विभागातर्फे याबाबत पुर्ण सहकार्य केले जाईल असेही ते म्हणालेत.

मा. सभापती यांनी निर्देशित केले कि, विधी विभागाने प्रशिक्षण शिबीर घेण्याच्या संदर्भातील तयारी करून समितीसमक्ष सादर करावी.

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत मा. आयुक्त यांनी खाजगी रस्त्यांबाबत नोटीफिकेशन काढून त्यांना सार्वजनिक रस्ते म्हणून घोषित करण्याबाबत चर्चा झाली असता व्यवहार व न्यायअभियोक्ता श्री. कपले यांनी माहिती देतांना सांगितले कि, कुठल्या रस्त्याचे नोटीफिकेशन झालेले आहे किंवा नाही याबाबत आजच्या घडीला माहिती नाही. करिता कार्यकारी अभियंत्याकडे कुठल्या रस्त्याचे नोटीफिकेशन झालेले आहे आणि कुठल्या रस्त्याचे झालेले नाही. याबाबत माहिती घेवून नोटीफिकेशन न झालेल्या रस्त्याचे नोटीफिकेशन करण्यासंबंधी समितीमार्फत निर्देशित करण्यात यावे असे त्यांनी सांगितले.

मा.सभापती यांनी निर्देशित केले की नोटीफिकेशन न झालेल्या रस्त्याचे नोटीफिकेशन कार्यकारी अभियंता यांनी करावे. मा.सदस्य श्री.घोडेस्वार यांनी सुचित केल्याप्रमाणे पुढच्या बैठकीत रस्त्यावरील अतिक्रमण आणि बाजार विभागातील दुकानावरील झालेले अतिक्रमणाच्या संदर्भातील विषय विषयपत्रिकेवर आणण्यात यावे असे मा. सभापती यांनी सुचित करून तदनंतर मा.सभापती विधी समिती यांनी सभेचे समापन केले.

**निगम सचिव**
**म.न.पा.नागपूर**

**सभापती**
**विधी समिती,**
**म.न.पा. नागपूर**

**मंगळवार दिनांक 23.01.2018 रोजी दुपारी 04–00 वाजता नागपूर महानगरपालिकेच्या विधी समितीच्या सिव्हिल कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या स्थगित सभेचा अहवाल.**

**सभेत मा. सभापती, श्रीमती मिनाक्षी तेलगोटे, मा.सदस्या श्रीमती हर्षला साबळे, मा. सदस्य श्री. अमर बागडे, मा.सदस्या श्रीमती समिता चकोले तसेच प्रशासनाकडून व्यवहार व न्यायअभियोक्ता(श्री.कपले) व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.**

मा. सभापती विधी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली. सभेच्या सुरुवातीस विषयपत्रिकेवरील विषयावर खालीलप्रमाणे सुरुवात करण्यात आली.

1.विधी विभागांतर्गत 12 विधी सहायक यांचे रू. 10,000/– च्या मानधनावर नियुक्ती करण्याच्या प्रक्रियेवर चर्चा व निर्णय घेण्यास्तव व्यवहार व न्यायअभियोक्ता श्री.कपले यांनी माहिती देतांना सांगितले कि, प्रत्येक झोनकरिता एक विधी सहायकाचे पद याप्रमाणे आकृतीबंधामध्ये 12 पदे मंजूर केली आहेत. शासनाकडून आकृतीबंध मंजूर होवून यावयाचा आहे. जोपर्यंत आकृतीबंध मंजूर होवून येत नाही तोपर्यंत कंत्राटपध्दतीवर 12 विधी सहायक नेमावयाचे आहे त्याकरिता 10 हजार रू.मानधन प्रस्तावित केले आहे. स्थायी समितीने त्याच्या खर्चाला मंजूरी दिलेली आहे. विधी सहायकाची शैक्षणिक पात्रता एलएलबी ग्रेज्युएट असली पाहिजे. त्यांना कामाचा 1 वर्षाचा अनुभव असला पाहिजे. विधि विषयक कामे आणि कार्यालयीन टिपणी तयार करण्याचे काम असून कमीत कमी त्यांना 4 तास काम करावयाचे आहे. विधि विभागाच्या माताहत ते काम करतील. ते स्वतंत्र व्यवसाय करू शकतील परंतु महानगरपालिकेच्या विरोधात कोणतीही केस घेणार नाही असा कबुलीजबाब त्यांना लिहून द्यावा लागेल. जोपर्यंत आकृतीबंध मंजूर होवून येत नाही तोपर्यंत ही पदे कंत्राटी पध्दतीवर राहणार आहे. यांना स्थायी स्वरूपाची नोकरी मागण्याचा अधिकार राहणार नाही अशी अट टाकलेली आहे. सुरूवातीला 6 महिन्याकरिता घेत असून जाहिराती द्वारे मुलाखती घेवून ही पदे नियुक्त करण्यात येतील असे त्यांनी सांगितले यावर समितीचे काही सुझाव असल्यास ते नमुद करावेत असेही ते म्हणालेत.

मा.सभापती यांनी विधी सहायक या पदाकरिता कमीत कमी 2 वर्षाचा कामाचा अनुभव असावा असे सुचित केले. या विषयाला समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

2.महाराष्ट्र महानगरपालिका कलम 30(2) अन्वये दि. 30.10.2017 रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. 120 मा.नगरसेवक श्री.बंटी शेळके यांनी सर्वसाधारण सभेत मांडलेल्या प्रश्नाबद्दलचे संशोधन व अभिप्राय बाबत व

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील 1(जे) अन्वये दि. 16.10.2017 रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. 130 मा. नगरसेवक श्री.प्रविणजी दटके यांनी सर्वसाधारण सभेत मांडलेल्या प्रश्नाबाबत मा.सभापती यांनी निर्देशित केले कि, संबंधित विभागाने येत्या 8 दिवसात समितीला लेखी अहवाल सादर करावा त्यावर समिती चर्चा करून निर्णय घेईल.

तद्नंतर मा.सभापती यांनी सर्वपक्षीय नगरसेवकांना विधी विषयक ज्ञान प्राप्त होईल या अनुषंगाने कार्यशाळा आयोजित करण्याबाबत व्यवहार व न्यायअभियोक्ता श्री.कपले यांना सुचित केले असता त्यांनी या कार्यशाळेच्या अनुषंगाने कोणत्या विषयावर तज्ञांकडून मार्गदर्शन घेण्यात यावे ते विषय ठरवून घ्यावेत असे सांगितले.

तदनंतर मा.सभापती विधी समिती यांच्या परवानगीने सभेचे समापन करण्यात आले.

**निगम सचिव**
**म.न.पा.नागपूर**

**सभापती**
**विधी समिती,**
**म.न.पा. नागपूर**